दहावीचा आज ऑनलाईन निकाल

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर तसेच कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र अर्थात इयत्ता १० वीचा परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर आज, मंगळवारी दुपारी एक वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे सचिव देवीदास कुलाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

या अधिकृत संकेतस्थळांवर निकाल पाहा

1. https://results.digilocker.gov.in
2. https://sscresult.mahahsscboard.in
3. http://sscresult.mkcl.org
4. https://results.targetpublications.org
5. https://results.navneet.com
6. https://www.tv9hindi.com/education/board-exams/maharashtra-board-exams
7. https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-ssc-10-results
8. https://www.indiatoday.in/education-today/results
9. https://www.aajtak.in/education/board-exam-results

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवरून उपलब्ध होतील .. या माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल. तसेच https://mahahsscboard.in (in school login) या संकेतस्थळावर शाळांना एकत्रित निकाल आणि इतर सांख्यिकीय माहिती उपलब्ध होईल.या निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे

ऑनलाईन निकालानंतर दहावीच्या परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून https://mahahsscboard.in स्वतः किंवा शाळांमार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी शर्ती तसेच सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. गुणपडताळणी आणि छायाप्रतीसाठी बुधवार, दिनांक १४ मे २०२५ ते बुधवार, दिनांक २८ मे २०२५ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल.

गंभीर दुखापतग्रस्त रुग्णास 'किम्स मानवता'मध्ये जीवदान

नाशिक । नुकत्याच एका अपघातात डोक्यास गंभीर दुखापत झालेल्या ७१ वर्षीय रुग्णावर किम्स मानवता हॉस्पिटलमध्ये न्यूरो सर्जन डॉ. इशान नेरकर यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरित्या कन्झर्वेटिव्ह मॅनेजमेंटद्वारे उपचार करण्यात आले. रुग्णाची प्रकृती स्थिर असून, त्यांच्यावर योग्य देखरेखीत उपचार सुरू आहेत. अपघात झाला त्या दिवशी रुग्णाचा ७१ वा वाढदिवस होता. ही बाब हॉस्पिटलच्या टीमला समजताच डॉक्टर, नर्सेस आणि संपूर्ण वैद्यकीय टीमने उपस्थित राहून केक कापून रुग्णाचा वाढदिवस साजरा केला. उपचार ही केवळ औषधांची बाब

नसून ती माणूसकीची आणि काळजीची गोष्ट असल्याची भावना व्यवस्थापकीय संचालक डॉ. राज नगरकर यांनी व्यक्त केली. किम्स मानवता हॉस्पिटलने नेहमीच वैद्यकीय नव्हे तर भावनिक आणि मानसिक आधार देणाऱ्या सेवा दिल्या आहेत. ही घटना त्याचेच उत्तम उदाहरण असल्याचे सीओओ डॉ. नीलेश सिंह म्हणाले.

एसटीत लवकरच सेवक भरती

परिवहन मंत्री सरनाईक यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी भविष्यात आपण २५ हजार स्वमालकीच्या बसेस घेत आहोत. या बसेसच्या चालविण्यासाठी आपल्याला मनुष्यबळाची गरज लागणार असून, चालक आणि वाहकपदासह अन्य काही वर्गातील पदे रिक्षील येत्या काही वर्षात एसटी महामंडळात भरली जाणार आहेत. त्याबाबतच्या उत्रावाला नुकतीच संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आल्याची अशी माहिती परिवहन मंत्रीतथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सोमवारी दिली.

एसटी महामंडळाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता उच्च न्यायालयाने एसटी महामंडळातील कर्मचारी भरतीला २०२४ पर्यंत मनाई केली होती. तथापि, येत्या काही वर्षांमध्ये निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेता, नव्या बसेस चालवण्यासाठी चालक, वाहक या पदासह अन्य कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची भरती करणे अत्यंत आवश्यक असून, याबाबतच्या ठरावाला एस. टी. महामंडळाच्या ३०७ व्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. तसेच हा प्रस्ताव सरकारच्या मंजुरीसाठी पाठवण्यात येणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

सध्या एसटी महामंडळाच्या अनेक विभागांमध्ये कुशल मनुष्यबळाचा अभाव आहे. अनेक ठिकाणी चांगले अधिकारी आवश्यक असून विशेषतः भविष्यात पीपीपी तत्त्वावर विकसित होणाऱ्या एसटीच्या जागे बाबतीत बांधकाम विभागाकडे कुशल अभियंत्यांची गरज भासणार आहे. त्यामुळे सध्या रिक्त असलेल्या अभियंत्यांच्या जागा करार पद्धतीने आणि सरळ सेवा भरतीच्या माध्यमांतून भरण्यात येणार आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. नव्या कर्मचारी भरतीच्या अनुषंगाने एसटीच्या प्रत्येक खात्यांनी आपल्या विभागातील रिक्त पदांचा फेअआढावा घेऊन आवश्यक असणाऱ्या पदांची भरती करण्याबाबत एकत्रित मागणी सादर करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण प्रयत्नशील

नाशिकरोड/जेलरोड । प्रतिनिधी

गेल्या तीन ते चार दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाचा धुमाकूळ अद्यापही सुरूच आहे. या पावसामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत होत आहे तसेच विद्युत पुरवठा सातत्याने खंडित होत आहे. मात्र, यानंत्र महावितरणची यंत्रणा खडबडून जागी झाली असून अनेक ठिकाणी त्यांनी विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यश मिळविले आहे.

सोमवारी दुपारी नाशिकरोड परिसरातील देवळाली गाव, जेलरोड, विहितगाव, सिन्नर फाटा, दसक, पंचक आदी भागात मोठ्या प्रमाणात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. परिणामी यामुळे अनेक ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित झाला होता तर नागरिकांची धावपळ उडाली होती. त्याचप्रमाणे देवळाली गाव येथे सोमवारचा आठवडे बाजार भरत असल्याने या ठिकाणी सुद्धा भाजीपाला विक्री करण्यासाठी आलेले शेतकरी व व्यापाऱ्यांचे हाल झाले तसेच खरेदीसाठी आलेल्या महिला व नागरिकांना सुद्धा या पावसाचा त्रास सहन करावा लागला.

महावितरणची धावपळ

दरम्यान गेल्या दोन ते तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे विद्युत पुरवठा खंडित होत असून, या संदर्भात महावितरणने म्हटले आहे की, रविवारी दुपारी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे नाशिक शहर व परिसरातील अनेक भागात विद्युत यंत्रणेवर झाडे आणि फांद्या कोसळल्याने महावितरणच्या यंत्रणेला फटका बसला. त्यामुळे महावितरणच्या ३३ व ११ केव्हीच्या वाहिन्यांचा तसेच रोहित्रांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. मात्र, बंद झालेली वीज यंत्रणा सुरु करण्यासाठी रविवारी रात्री उशिरापर्यंत अविरत कार्य करीत महावितरणच्या अभियंत्यांनी व जनमित्रांनी

टप्याटप्प्याने वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे काम केले.

वीजग्राहकांनी सहकार्य करावे

महावितरण नाशिक मंडळाचे अधिक्षक अभियंता राजेश थूल, कार्यकारी अभियंते चेतन वाडे व जगदीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अभियंते व जनमित्र सातत्याने कार्य करीत आहेत. आपल्या परिसरात विद्युत पुरवठा खंडित असल्यास महावितरणच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३३४३५/ १८००२१२३४३५ / १९१२ यावर तसेच आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ संबंधित महावितरणच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा. ग्राहकांना अखंडित, सुळळीत व सुरक्षित ग्राहक सेवेसाठी यंत्रणा सज्ज असून ग्राहकांनी या काळात सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

झाडाखाली दबून दोन युवक ठार

कंपनीत इंटर्नशिपला जाताना काळाची झडप; महिनाभरात तिघांचा मृत्यू

नाशिक। प्रतिनिधी

इंटर्नशिपसाठी मोपेडवरुन कंपनीत जातांना अजस्त्र झाड उन्मळून दोन प्रशिक्षणार्थी तरुण झाडाखाली दबून ठार झाले.

ही धक्कादायक घटना सोमवारी(दि. १२) दुपारी सातपूर पोलीस ठाण्याजवळील तापारिया टूल्स कंपनीजवळ घडली. गौरव भास्कर रिपोर्टे (वय २१) आणि सम्यक निलेश भोसले (१९, दोघे रा. रमाबाई आंबेडकरनगर, मालधक्का रोड, गुलाबवाडी, देवळाली गाव)अशी मृत तरुणांची नावे आहेत. दोघेही गंभीररित्या जखमी झाले असता, गौरवचा जिल्हा रुग्णालयात तर सम्यकचा खासगी रुग्णालयात मृत्यू झाला.

गौरव आणि सम्यक हे सातपूर औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीत वर्षभरापासून इंटर्नशिप करत होते. सोमवारी (दि.१२) दुपारी दोघेही मोपेडवरून (एमएच १५ एचडब्ल्यु ०५६५) सातपूरच्या महिंद्रा कंपनीत जात होते. सकाळ सर्कलकडून ते महिंद्रा कंपनीकडे जात असताना तापारिया कंपनीसमोर असताना सोसाट्याचा वारा आला. यात रस्त्यालगतचे झाड अचानक उन्मळून धावत्या मोपेडवर कोसळले. या अपघातामध्ये दोघांच्या डोक्याला आणि इतरत्र गंभीर मार लागला. दोघांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गौरव रिपोर्ट यास तपासून मृत घोषित केले. तर सम्यक भोसले याच्यावर प्राथमिक उपचार करून खासगी हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले. परंतु त्याचाही मृत्यू झाला. सातपूर पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

शहरात रस्त्याने जाणाऱ्या दुघाकीवर झाडाचा काही भाग कोसळून आई ठार तर मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना गंगापूर रोडवरील सोमेश्वर बसस्टॉपजवळ एप्रिलमध्ये घडली होती. यंत्रणेने लवकरच पावसाळापूर्व कामे व झाडांची छाटणी केली असती, तर ही घटना टाळता आली असती, असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला होता. वरील घटनेत गौरव हा एकुलता होता. दोघा मित्रांच्या मृत्यूमुळे कुटुंबीयाचा आधार गेल्याने देवळाली गाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नाशकात विद्युत उपकेंद्रावर तांत्रिक बिघाड

नागरिकांनी सहकार्य करावे; महावितरणचे आवाहन

नाशिक । प्रतिनिधी

शहरामध्ये कालच्या मुसळधार पावसामुळे व जोरदार वाऱ्यामुळे खांब कोसळले, वीज वाहिन्या तुटल्या. विद्युत यंत्रणेवर मोठी झाडे पडल्याने पुरवठा खंडित झाला. यामध्ये तिबेटीयन मार्केटजवळ असलेल्या ३३ केव्ही सातपूर विद्युत उपकेंद्रावर तांत्रिक बिघाड झाल्याने येथून निघणाऱ्या सर्व ११केव्ही वाहिन्यांचा यामध्ये प्रामुख्याने कॉलेजरोड, गंगापूररोड, एबीबी सर्कल, सिटी सेंटर मॉल, उंटवाडी, या भागातील बाधित पुरवठा रविवारी टप्प्याटप्प्याने रात्री उशिरापर्यंत पूर्ववत करण्यात आला.

यासोबतच कामटवाडे परिसरात सुद्धा बंद झालेला वीजपुरवठा अविश्रांत कार्य करीत सुरू करण्यात आला. सोमवारी पुन्हा दुपारी आलेल्या पावसाने व जोरदार हवेमुळे झाडे पडून वीजपुरवठा खंडित झाला. यामध्ये कॉलेजरोड, गंगापूर रोड, पंचवटी, संजयनगर, हिरावाडी, विनयनगर, पेठरोड, दिंडोरीरोड व परिसर या भागात तसेच सिव्हिल हॉस्पिटलजवळील विद्युत उपकेंद्र यामध्ये झाड पडल्याने तेथील वीजपुरवठा दीड तास खंडित झाला होता. झाड बाजूला करून कर्मचाऱ्यांनी तो तत्काळ सुरू केला. यासोबतच खांब कोसळल्याने सीबीएस, जिल्हा न्यायालय, ठक्कर बाजार, कॅनडा कॉर्नर, मुंबई नाका, चांडक सर्कल व परिसर या भागात बंद झाला. मात्र, बहुतांश शहरातील वीजपुरवठा सुरळीत सुरू होता. वीजपुरवठा सुरू करण्याचे कार्य सातत्याने सुरु असून महावितरणचे अभियंते, जनमित्र कर्मचारी व कंत्राटदाराचे कामगार यांनी विद्युत यंत्रणेवर पडलेले झाडे फांद्या यासोबतच तुटलेले तार दुरुस्त करीत अविरत प्रयत्न करीत शहरातील व परिसरातील वीजपुरवठा पूर्ववत करीत आहेत.

रस्ते दुरुस्ती, पाण्यासाठी रहिवाशांची निदर्शने

नवीन नाशिक । प्रतिनिधी

अवकाळी पाऊस आणि महापालिकेच्या हलगर्जीपणाचा फटका तिडकेनगर, कर्मयोगीनगर, कालिका पार्कस्थ प्रभाग २४ मधील रहिवाशांना सलग दुसऱ्या दिवशी बसला. रस्ते दुरुस्ती आणि पाण्यासाठी सोमवारी या भागातील रहिवाशांना आंदोलन करावे लागले.

टँकरने पाणी दिल्याने व आठ दिवसांच्या आत रस्ते दुरुस्ती, पावसाळी गटारची कामे करण्याचे आश्वासन महापालिका अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर आंदोलन थांबविण्यात आले. कालिका पार्क भागात सलग तीन दिवसांपासून पाणी नसल्याने त्रस्त महिलांनी हंडे, भांडे घेवून रस्त्यावर निदर्शने केली, घोषणाबाजी केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड-देशमुख यांच्या प्रयत्नानंतर महापालिकेच्या टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला. कर्मयोगीनगर येथे चार-पाच दिवसांपासून मुख्य रस्ता जलमय झाला आहे. सोमवारी हा रस्ताच खचला, त्यात पाण्याचा टँकर फसल्याने वाहतूक कोंडी झाली, येथेही रहिवाशांनी घोषणाबाजी केली. खड्ड्यात काठी उभी करून तिला फेटा बांधून प्रशासनाचा प्रातिनिधीक उपरोधिक सत्कार करण्यात आला.

रविवारी घरांमध्ये पाणी शिरले होते. सोमवारी रहिवासी पुन्हा या ठिकाणी जमले, नाल्यातील पाण्याचा प्रवाह सुरू करण्याची मागणी करीत निदर्शने करण्यात आली. कालिका पार्क, जगतापनगर, कर्मयोगीनगर, गोविंदनगर या भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यांवर पाणी साचले होते. सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड देशमुख, शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सलग दोन दिवस या भागात आंदोलन झाले. यावेळी प्रथमेश पाटकर, मनोज अठ्ठावलकर, अनिल रिकामे, सुधाकर भदाणे, विनोद पोळ, अशोक चौधरी, शोभा शेळके, प्रतिभा निकुंभ, नम्रता बावीस्कर, प्रज्ञा मालपुरे, उषा पैठणकर, शीतल गवळी, कांता पोळ, लता काळे आदी नागरिक उपस्थित होते.

खड्ड्याची पाहाणी करतांना मनपा अधिकरी, सेवक

कर्मयोगीनगर येथे खड्ड्यात अडकलेला टँकर

आजचे कार्यक्रम

वसंत व्याख्यानमाला

* स्व. डॉ. मूळचंदभाई गोठी स्मृती व्याख्यान

वक्ते : विष्णू मनोहर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शेफ, नागपूर

विषय : असे घडले विश्वविक्रम आणि मराठी पदार्थांचे जागतिकीकरण

* युनिक स्टार ग्रुप प्रस्तुत - राज कपूर गाणे

पान १ वरुन..

टेरर आणि टॉक, टेरर आणि ट्रेड, पाणी आणि खून एकत्र होवू शकत नाही

विचारुन ठार मारले. दहशवाद्याचा हा बीभत्स चेहरा आहे. दहशतवाद्यांना मातीत गाडण्यासाठी आपण भारतीय सैन्य दलास संपूर्ण मोकळीक दिली होती. आमच्या माता-भगिनींचे कुंकू पुसण्याचा परिणाम काय होतो, हे आम्ही दाखवून दिले, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ऑपरेशन सिंदूरचे वर्णन केले.

पंतप्रधान मोदींनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करत दहशवाद्यांना अशाच पद्धतीने उत्तर भविष्यातही दिले जाईल. दहशतवादी आणि त्यांना थारा देणाऱ्या पाकिस्तान सरकारला एकाच नजरेने बघितले जाईल.हे युग युद्धाचे नाहीये, पण हे युग दहशतवादाचेही नाही. दहशतवादाविरोधात झिरो टॉलरन्स ही चांगले विश्वाची गॅरंटी आहे. पाकिस्तानी सैन्य, पाकिस्तानचे सरकार ज्या प्रकारे दहशतवादाला खतपाणी घालत आहेत. हाच दहशतवाद एक दिवस पाकिस्तानलाच संपवून टाकेन, असा इशारा पंतप्रधान मोदी म्हणाले, पाकिस्तानला जर जगायचे असेल, तर त्याला दहशतवादी अड्ड्यांची सफाई करावीच लागेल. त्याशिवाय शांती प्रस्थापित होण्याचा कोणताही मार्ग नाहीये.

ट्रम्प म्हणाले, अणुयुद्ध रोखले

भारत आणि पाकमधील अंतर्गत वादात अमेरिकेने हस्तक्षेप का केला? दोन देशांमध्ये संघर्ष शिगेला पोहोचलेला असताना अचानक दोन्ही देशांनी शस्त्रविराम का पुकारला असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. यावर आता खुद्द अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, शनिवारी माझ्या प्रशासनाने तात्काळ शस्त्रविराम करण्यास मदत केली, मला वाटते की भारत आणि पाकिस्तानमध्ये कायमस्वरूपी शस्त्रविराम होईल. या दोन्ही देशांमध्ये भरपूर अण्वस्त्रे आहेत. ते पुढे म्हणाले, तुम्हाला हे सांगताना मला खूप अभिमान वाटतो की भारत आणि पाकिस्तानचे नेतृत्व अढळ आणि शक्तिशाली होते. दोन्ही प्रकरणांमध्ये त्यांच्याकडे परिस्थितीचे गांभीर्य पूर्णपणे जाणून घेण्याची आणि समजून घेण्याची ताकद, शहाणपण आणि धैर्य होते. आणि आम्ही खूप मदत केली आणि व्यापारातही मदत केली. मी म्हणालो आम्ही तुमच्यासोबत खूप व्यापार करणार आहोत. त्यामुळे युद्ध थांबवूया. जर तुम्ही ते थांबवले तर आम्ही व्यापार करत राहू, जर तुम्ही ते थांबवले नाही तर आम्ही कोणताही व्यापार करणार नाही.ते पुढे म्हणाले, आम्ही एक अणुयुद्ध थांबवले. मला वाटते की ते एक वाईट अणुयुद्ध असू शकले असते. लाखो लोक मारले गेले असते. मी उपराष्ट्रपती जेडी व्हान्स आणि परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांचेही त्यांच्या कामाबद्दल आभार मानू इच्छितो.

महिला संधीचे सोने करतील?

काम गंभीरपणे करतात. हीच स्वभाव वैशिष्ट्ये त्यांना चांगल्या वाहनचालक बनवू शकतील का? गुलाबी रिक्षा नोकरदार महिलांना सुरक्षित प्रवासाची संधी देतील असे एक उद्दिष्ट आहे. महिला महिलांना जवळच्या वाटतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी गुलाबी रिक्षातून प्रवास करणे नोकरदार महिलांना सुरक्षित वाटू शकेल. तथापि त्यासाठी किमान रात्री दहा-अकरा वाजेपर्यंत रस्त्यांवरून गुलाबी रिक्षा धावणे आवश्यक आहे. महिलांच्या दृष्टीने सध्याचे सामाजिक वातावरण असुरक्षित मानले जाते. तेव्हा रात्री किती उशिरापर्यंत महिलाचालक त्यांची गुलाबी रिक्षा चालवतील हा प्रश्नच आहे.

पण निदान रात्री काहीकाळ तरी महिलांना त्यांचा आधार वाटू शकेल, हेही नसे थोडके. महिलांना त्यांच्या पायावर उभे राहण्याची संधी ही योजना त्यांना मिळवून देणार आहे. जसजशा गुलाबी रिक्षा रस्त्यांवरून धावू लागतील तसतसे या योजनेचे फायदे आणि त्यातील उणिवा लक्षात येतील असे गृहीत धरायला काय हरकत आहे?

'पाकने दहशतवाद्यांविरुद्धच्या लढाईला स्वत:ची लढाई बनवले'

म्हणून त्यांना प्रत्युत्तर देणे आवश्यक होते, असे एअर मार्शल भारती यांनी स्पष्ट शब्दात सांगितले.

भारती पुढे म्हणाले, आपली हवाई सुरक्षा प्रणाली म्हणजेच एअर डिफेन्स सिस्टीम देशासाठी अभेद्य भिंत बनून उभी होती. या भींतीला धडक देणे शत्रू राष्ट्राला अशक्यच होते.तसेच, ऑपरेशन सिंदूरवेळी भारतीय वायू दलाने दहशतावाद्यांच्या तळांवर केलेल्या हल्ल्याचे काही फोटो व व्हिडिओ त्यांनी पत्रकार परिषदेतून दाखवले. भारताच्या एकाही एअर बेसवर शत्रू राष्ट्राकडून हल्ला झाला नाही. भारतीय हवाई दलाचे सर्वच तळ सुरक्षित आहेत. हवाई दलाने कुठल्याही संशयास्पद वस्तूला एअर बेसजवळ पोहोचू दिले नसल्याची माहितीही त्यांनी दिली.

पत्रकार परिषदेत लेफ्टनंट जनरल राजीव घई म्हणाले की, आपल्या एअर डिफेन्सच्या मोहिमेला एका कॉन्टेक्समध्ये समजून घ्यायला हवं. पहलगाम हल्ला म्हणजे दहशतवाद्यांच्या पापाचा घडा भरला होता. त्यामुळे, आम्ही पूर्ण तयारी केली होती. त्यानुसार, एअर स्ट्राईकची कारवाई केली.पाकिस्तानकडून ड्रोन होते ते आपण पाडून टाकले. मी बीएसएफ जवानांचेही कौतुक करेल. कारण, जागता पहारा देणारे जवान या मोहिमेत मोठ्या हिंमतीने आमच्यासोबत उभे राहिले, त्यामुळे पाकिस्तानच्या नापाक कृत्यांचा नायनाट करण्यात आला. जब हौसलों बुलंद हों, तो मंजिलें भी कदम चूमती हैं.. अशी शायरी यावेळी घई यांनी बोलून दाखवली.